सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - ८७ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि. १२ मे २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

# पंतप्रधान मोदींनी केलेल्या आवाहनांवर शरद पवारांनी व्यक्त केली चिंता

## राज ठाकरेंनी मोदींना पत्र लिहित सुनावली खरीखोटी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२मुंबई**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी (ता. १० मे) एका भाषणात जनतेला संबोधित केले. या संबोधनातून त्यांनी जनतेला सोने खरेदी करू नका, वर्षभर परदेशातील प्रवास करू नका, वर्क फ्रॉम होम करा, पेट्रोल - डिझेलचा वापर कमी करा, खाद्य तेलाचा वापर कमी करा, असे उपदेश केले. त्यांनी केलेल्या या उपदेशानंतर जनतेमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे. कारण, मोदींनी केलेल्या या आवाहनामुळे देशात लॉकडाऊन तर लागणार नाही ना? असाही प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे. परंतु, मोदींच्या या आवाहनानंतर विरोधक आक्रमक झाले आहेत. विरोधकांनी मोदींच्या या आवाहनांवर टीका केली आहे. त्यानंतर आज मंगळवारी (ता. १२ मे) याच मुद्द्यावरून मनसे अध्यक्ष राज ठाकरेंनी मोदींवर हल्लाबोल केला असतानाच आता राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार यांनीही याच मुद्द्यावरून चिंता व्यक्त केली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी सोशल मीडियावर पंतप्रधान मोदी यांनी केलेल्या आवाहनाला उद्देशून एक पोस्ट केली आहे. त्यांनी आपल्या पोस्टमध्ये पंतप्रधान मोदींना सल्ला किंवा विनंती करत म्हटले आहे की, मध्यपूर्वेतील अस्थिर आणि युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दोन दिवसांपूर्वी काही घोषणा केल्या. त्याचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर दूरगामी परिणाम होण्याची शक्यता आहे. या घोषणा अचानक करण्यात आल्याने सर्वसामान्य नागरिक, उद्योग-व्यवसाय क्षेत्र तसेच गुंतवणूकदारांमध्ये अस्वस्थतेचे वातावरण निर्माण झाले आहे. ही बाब निश्चितच काळजी निर्माण करणारी आहे. अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या.तसेच, या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन पंतप्रधानांनी स्वतःच्या अध्यक्षतेखाली सर्वपक्षीय बैठक आयोजित करावी. राष्ट्रीय हिताच्या प्रश्नांवर सर्व पक्षीय नेत्यांना विश्वासात घेऊन निर्णय-प्रक्रिया राबविणे देशहितासाठी अत्यंत आवश्यक आहे. सध्याची आंतरराष्ट्रीय परिस्थिती लक्षात घेता केंद्र सरकारने अधिक संवेदनशीलता आणि व्यापक सल्लामसलत यांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. यासोबतच पंतप्रधानांनी देशातील नामवंत अर्थतज्ज्ञ, उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधी आणि संबंधित तज्ज्ञांची तातडीने बैठक बोलावून परिस्थितीचा सखोल आढावा घ्यावा. पुढील धोरणांबाबत व्यापक विचारविनिमय करावा. देशातील जनतेमध्ये विश्वास आणि स्थैर्य निर्माण करणे, यालाच सद्यस्थितीत सरकारचे सर्वोच्च प्राधान्य असले पाहिजे, अशी आमची ठाम भूमिका आहे. असे



यावेळी शरद पवारांनी स्पष्टपणे सांगितले आहे.

**मोदींना पत्र लिहित राज ठाकरेंनी सुनावली खरीखोटी**

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मंगळवारी (ता. १२ मे) फेसबूक, द प्लॅटफॉर्म या सोशल मीडिया साइट्सवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना आणि त्यांनी केलेल्या आवाहनांबाबत भलीमोठी पोस्ट केली आहे. या पोस्टमधून त्यांनी थेट मोदींना, त्यांच्या सहकाऱ्यांना आणि गेल्या १० वर्षातील त्यांच्या कार्यावर प्रश्न उपस्थित केले आहेत. राज ठाकरेंनी आपल्या पोस्टच्या सुरुवातीला म्हटले आहे की, सस्नेह जय महाराष्ट्र, पंतप्रधान नरेंद्र मोदींनी दोन दिवसांपूर्वी तमाम भारतीयांना काटकसर करण्याचं आवाहन केलं. सोनं खरेदी कमी करा किंवा जवळपास थांबवाच, परदेशात गरज नसेल तर जाऊ नका, पेट्रोल डिझेलचा वापर कमी करा, विजेवर चालणाऱ्या गाड्या जास्त वापरा, वर्कफ्रॉम होमचा पर्याय स्वीकारा इत्यादी इत्यादी. हे सगळं का ? तर, सोनं, पेट्रोल डिझेल हे आयात करावं लागतं आणि त्यात विदेशी गंगाजळी मोठ्या प्रमाणवर खर्च होते. आणि सध्या इराण युद्धामुळे खनिज तेलाचे भाव प्रचंड वाढलेत. असे लिहिले.

तुम्ही काय पाऊलं उचलणार आहात हे जनतेला सांगा. संसदेला सांगा. तसंही हवं तेव्हा विशेष अधिवेशन घेण्याची प्रथा पडली आहेच. त्यामुळे संसदेचं विशेष अधिवेशन घेऊन ही परिस्थिती का आली आहे यावर सगळ्यांना उत्तर द्या. तुमच्या अनेक भूमिकांना आमचा विरोध होता आणि आहे. तसेच तुमच्या चांगल्या केलेल्या कामांचेही समर्थन केलेलं आहे परंतू आजच्या परिस्थितीत आमच्यासकट कोणीही तुमचे विरोधक नाही अथवा शत्रू नाही. असला आक्रस्ताळेपणा आमच्यात नाही.

पण म्हणून प्रश्न विचारायचे नाहीत असं होणार नाही. ते आम्ही विचारणार. तेंव्हा पंतप्रधानांनी स्वतःच्या पक्षापासून काटकसर सुरु करावी आणि हे सगळं कसं निस्तरणार हे देशाला सांगावं !, असे स्पष्टपणे राज ठाकरेंनी आपल्या पत्रातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना म्हटले आहे.

# अजित पवारांच्या राष्ट्रवादीत भूकंप

## पटेल, तटकरे अन् भुजबळांना डच्चू? कार्यकारिणीच्या नव्या यादीने खळबळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १२मुंबई**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) राष्ट्रीय कार्यकारिणीची नवीन यादी समोर आली असून, यामध्ये अनेक धक्कादायक बदल पाहायला मिळत आहेत. केंद्रीय निवडणूक आयोगाला सादर करण्यात आलेल्या या यादीतून पक्षाचे ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल यांचे नाव वगळण्यात आले आहे. तसेच सुनील तटकरे, छगन भुजबळ आणि दिलीप वळसे-पाटील या दिग्गज नेत्यांनाही कार्यकारिणीत स्थान मिळालेले नाही. या घडामोडीनंतर राष्ट्रवादी काँग्रेसमधील अंतर्गत कलह चव्हाट्यावर आल्याची चर्चा सुरू झाली आहे.

राष्ट्रवादीकडून राष्ट्रीय पदाधिकाऱ्यांची ही यादी केंद्रीय निवडणूक आयोगाला सुपूर्द करण्यात आली. आयोगाला दिलेल्या या यादीतून पटेलांना वगळले आहे का? अशी चर्चा आता रंगली आहे, कारण त्यांच्या नावासमोर तसा कोणताही उल्लेख दिसत नाही. विशेष म्हणजे, जय पवार यांना राष्ट्रीय कार्यकारिणीत स्थान मिळाले आहे; मात्र प्रफुल्ल पटेलच नव्हे, तर सुनील तटकरे, छगन भुजबळ आणि वळसे-पाटील यांनाही स्थान मिळालेले नाही. यादीवरून निर्माण झालेला वाद आणि चर्चा पाहता सुनेत्रा पवार यांनी तात्काळ भूमिका स्पष्ट केली आहे. त्यांनी म्हटले की, प्रसारमाध्यमांमध्ये प्रसारित होत असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांच्या यादीत तांत्रिक चूक झाली आहे.



ही चूक लवकरच दुरुस्त केली जाईल.

या नवीन कार्यकारिणीत अजित पवारांच्या मुलांकडे महत्त्वाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. पार्थ पवार यांची जनरल सेक्रेटरी (सरचिटणीस) पदी, तर जय पवार यांची नॅशनल सेक्रेटरी (राष्ट्रीय सचिव) पदी नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्रवादीच्या या नव्या यादीत सुबोध मोहिते, सना मलिक, अविनाश आदिक, धीरज शर्मा, अभिषेक बोके, संजय प्रजापती, धनंजय शर्मा, राणा रणवीर सिंग आणि डॉ. रमण प्रीत सिंग यांच्या नावांचा समावेश आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाकडे सोपवण्यात आलेल्या या कार्यकारिणीमुळे अजित पवार गटासह राज्याच्या राजकारणातही मोठी खळबळ उडाली आहे.

राष्ट्रवादीच्या या नव्या यादीतील सर्वात धक्कादायक बाब म्हणजे अनुभवी नेत्यांना मिळालेला डच्चू. गेल्या अनेक वर्षांपासून पक्षाचा राष्ट्रीय चेहरा राहिलेल्या पटेल यांना कार्यकारिणीतून वगळल्याने राजकीय चर्चांना उधाण आले आहे. फक्त पटेलच नव्हे, तर महाराष्ट्रातील पक्षाचे एकमेव लोकसभा खासदार सुनील तटकरे यांचेही नाव सरचिटणीस पदावरून वगळण्यात आल्याचे समोर आले आहे. त्याचसोबत छगन भुजबळ, हसन मुश्रीफ आणि दिलीप वळसे-पाटील यांसारख्या दिग्गज नेत्यांची नावेही नवीन यादीतून गायब असल्याने, पक्षाने आपली जुनी फळी पूर्णपणे बाजूला केल्याचे चित्र स्पष्ट होत आहे.

# NEET २०२६ ची परीक्षा रद्द

## आता नव्याने घेण्यात येणार परीक्षा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२नवी दिल्ली :**

देशातील महत्त्वाच्या परीक्षांपैकी महत्त्वाची परीक्षा असलेली छएएढ २०२६ ची परीक्षा रद्द करण्यात आली आहे. या निर्णयामुळे लाखो विद्यार्थ्यांना मोठा धक्का बसला आहे. महत्त्वाची बाब म्हणजे ३ मे २०२६ रोजी ही परीक्षा घेण्यात आली होती. मात्र, या परीक्षेचा पेपर ४८ तास आधीच लीक झाल्याची माहिती परीक्षा झाल्यानंतर समोर आली होती. त्यामुळे मोठा वाद निर्माण झाला होता. मात्र, या वादानंतर या प्रकरणाची चौकशी सीबीआयकडे देण्यात आली होती. त्यामुळे आता ही परीक्षा रद्द करण्यात आली आहे. त्यामुळे ही परीक्षा आता नव्याने घेण्यात येणार असून त्याची तारीख लवकर जाहीर करण्यात येईल, अशी माहिती नॅशनल टेस्टिंग एजन्सी (छढ-) म्हणजेच राष्ट्रीय चाचणी संस्थेकडून ही माहिती देण्यात आली आहे.





छएएढ २०२६ चा पेपर लीक झाल्यानंतर अनेकांनी संताप व्यक्त केला होता. एआय तंत्रज्ञानाच्या काळातही पेपर लीक कसा होतो ? परीक्षेच्या ४८ तास आधीच इतक्या महत्त्वाच्या परीक्षेचा पेपर विद्यार्थ्यांना कसा मिळतो ? असे एक ना अनेक प्रश्न या निमित्ताने निर्माण झाले होते. त्यानंतर या प्रकरणाची चौकशी सीबीआयकडे सोपवण्यात आली. एनटीएने सांगितले की, नीट (यूजी) २०२६ परीक्षेसंदर्भात १० मे २०२६ रोजी एक प्रसिद्धीपत्रक जारी करण्यात आले होते. आता या संस्थेने विद्यार्थी, पालक आणि जनतेला काही नवीन निर्णयांबद्दल माहिती दिली आहे. एनटीएने सांगितले की, परीक्षेची निष्पक्षता आणि सुरक्षा सुनिश्चित करता यावी, यासाठी या प्रकरणाशी संबंधित काही तपास ८ मे २०२६ रोजीच केंद्रीय यंत्रणांकडे सोपवण्यात आले होते.

# मान्सून ४ दिवस आधी येण्याचा अंदाज

## बाडमेर दुसऱ्या दिवशी सर्वाधिक उष्ण, तापमान ४७.३AmoC

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२मुंबई** - राजस्थान, गुजरात, महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशात उष्णतेची लाट कायम आहे. सोमवारी देशात राजस्थानमधील बाडमेर सर्वात उष्ण शहर ठरले. येथे तापमान ४७.३ओउ नोंदवले गेले. तर जैसलमेरमध्ये तापमान ४६.५ओउ, फलोदीमध्ये ४५.६ओउ, बिकानेरमध्ये ४५.३ओउ आणि जोधपूरमध्ये ४४.९ओउ होते.देशातील इतर राज्यांमध्ये महाराष्ट्रातील अकोल्यात तापमान ४५.१ओउ, जळगावमध्ये ४४.३ओउ, अमरावतीमध्ये ४४ओउ, गुजरातच्या अहमदाबाद आणि अमरेलीमध्ये ४४.३ओउ आणि मध्य प्रदेशातील धारमध्ये ४४ओउ नोंदवले गेले.





हिमाचल प्रदेशात सोमवारी सकाळी आलेल्या जोरदार वादळी वाऱ्यासह पाऊस आणि ६५ किमी प्रति तास वेगाने वाहणाऱ्या वाऱ्यामुळे मोठे नुकसान झाले. कुल्लूमध्ये ५ घरे आणि ७ गोशाळांची छप्पर उडून गेली, तर मंडी, शिमला आणि कांगडामध्ये झाडे पडल्याने रस्ते बंद झाले.

बंगालच्या उपसागराच्या नैऋत्य भागात एक कमी दाबाचे क्षेत्र (डिप्रेशन) तयार झाले आहे. हे ४८ तासांत अधिक तीव्र होईल. या प्रणालीमुळे केवळ दक्षिण भारतातील राज्यांमध्ये पावसाचा जोर वाढणार नाही, तर मान्सून लवकर येण्यासाठीही अनुकूल परिस्थिती निर्माण होत आहे.

केरळमध्ये मान्सून येण्याची सामान्य तारीख १ जून आहे. यावेळी नवीन प्रणाली आणि अनुकूल वाऱ्यांमुळे तो २५ ते २७ मे दरम्यान केरळच्या किनारपट्टीवर पोहोचण्याची शक्यता आहे.

**मान्सून ४ दिवस आधी येऊ शकतो-** हवामान विभागाच्या अंदाजानुसार, बंगालच्या उपसागराच्या नैऋत्य भागात कमी दाबाचे क्षेत्र विकसित झाले आहे, जे पुढील ४८ तासांत अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. या प्रणालीच्या निर्मितीमुळे केवळ दक्षिण भारतातील राज्यांमध्ये पावसाचा जोर वाढणार नाही, तर मान्सून वेळेपूर्वी येण्यासाठीही अनुकूल परिस्थिती निर्माण होत आहे. केरळमध्ये मान्सून दाखल होण्याची सामान्य तारीख १ जून आहे. यावेळी नवीन प्रणाली आणि अनुकूल वाऱ्यांमुळे तो २५ ते २७ मे दरम्यान केरळच्या किनारपट्टीवर पोहोचण्याची शक्यता आहे.

# अवैध दारू निर्मिती आणि विक्रीवर तालुकास्तरीय समित्यांचे पुनर्गठन

## उपविभागीय दंडाधिकारी राहणार समितीचे अध्यक्ष

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती:**

राज्यातील अवैध दारू निर्मिती आणि विक्रीवर अधिक प्रभावीपणे नियंत्रण मिळवण्यासाठी राज्य सरकारने तालुकास्तरीय समित्यांचे पुनर्गठन करण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या नव्या रचनेनुसार, आता तहसीलदारांऐवजी उपविभागीय दंडाधिकाऱ्यांकडे या समितीचे अध्यक्षपद सोपविण्यात आले आहे. अवैध धंद्यांना आळा घालण्यात कसूर केल्यास संबंधित पोलीस ठाण्याचे प्रभारी आणि उत्पादन शुल्क निरीक्षकांना थेट जबाबदार धरले जाणार आहे.

यापुर्वी २००५ च्या शासन निर्णयानुसार ही समिती तहसीलदारांच्या अध्यक्षेतेखाली कार्यरत होती. मात्र, महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १०४९ मधील



कलम ९३ नुसार, दारूबंदीविषयक प्रतिबंधात्मक कारवाईचे अधिकार उपविभागीय दंडाधिकाऱ्यांना आहेत. ही बाब आणि छत्रपती संभाजीनगरच्या विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखालील अभ्यास गटाने केलेल्या शिफारशी लक्षात घेऊन गृह विभागाने या समितीच्या रचनेत बदल केला आहे.

**अशी असेल समितीची नवी रचना-** पुनर्गठीत समितीमध्ये प्रशासकीय अधिकाऱ्यांसोबतच लोकप्रतिनिधींचाही समावेश करण्यात आला आहे. उपविभागीय दंडाधिकारी हे या समितीचे अध्यक्ष राहणार असून संबंधित पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी (ठाणेदार) हे सदस्य सचिव असतील. उपविभागीय पोलीस अधिकारी, तहसीलदार, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे उपअधीक्षक आणि निरीक्षक तसेच वैद्यकीय अधिकारी हे सदस्य राहणार आहेत. पंचायत समितीमधील सर्व महिला लोकप्रतिनिधी या समितीच्या पदसिद्ध सदस्य असतील.अवैध दारूच्या धंद्यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी या समितीने महिन्यातून किमान एकदा बैठक घेणे बंधनकारक आहे. तालुक्यातील गावोगावी हातभट्टी किंवा अवैध दारूची विक्री पूर्णपणे बंद झाली आहे की नाही, याचा आढावा या बैठकीत घेतला जाईल. विशेष म्हणजे, एका तालुक्यात एकापेक्षा जास्त पोलीस ठाणी असल्यास ही समिती संपूर्ण तालुक्यासाठी एकच काम करेल.

### पालकमंत्र्यांच्या संमतीने वाढीव सदस्य

शासकीय किंवा अशासकीय सदस्यांची या समितीवर अतिरिक्त नियुक्ती करायची असल्यास, जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांशी विचारविनिमय करून निर्णय घ्याचा, असेही शासन निर्णयात स्पष्ट करण्यात आले आहे. या निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करण्याचे आदेश पोलीस महासंचालक आणि राज्य उत्पादन शुल्क आयुक्तांना देण्यात आले आहेत. अवैध दारू धंद्यांसंदर्भात पोलीस दल व राज्य उत्पादन शुल्क विभाग यांनी एकत्रितपणे ग्रामस्तरापासून राज्यस्तरापर्यंत करण्यात आलेल्या कार्यवाहीचा आढावा घेण्यासाठी राज्य उत्पादन शल्क मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली याआधीच अवैध दारू प्रतिबंधक राज्यस्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे. कठोर कारवाईचे अधिकार या समित्यांना आहेत.

## संपादकीय ......

# आखाती युद्धाची इष्टापत्ती!

*इराण, इस्त्रायल आणि अमेरिका यांच्यामध्ये आखाती भागात जे युद्ध सुरू आहे, त्यामुळे जगावर विशेषत: जे देश तेलासाठी आखाती देशांवर अवलंबून आहेत, त्यांच्यावर मोठी आपत्ती कोसळली आहे. पण कुठल्याही आपत्तीची ही दुसरी जमेची बाजू असते, त्याला इष्टापत्ती म्हणतात. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय जनतेला या आखाती युद्धाच्या पार्श्वभूमीवर हैदराबाद येथील एका कार्यक्रमात बोलताना मिनिमल जीवन पद्धती अंगीकारण्याचे आवाहन केले आहे, त्यावरून विरोधक त्यांच्यावर जोरदार टीका करत आहेत. काही नफेखोर व्यावसायिक लोक तसेच ज्यांना उधळपट्टी करून ऐशारामी जीवन जगणे अंगवळणी पडले आहे, ते नाराज झाले आहेत. पण मोदींनी भारतातील लोकांना अनावश्यक खर्च टाळा असा सल्ला दिलेला आहे, यात काहीच चुकीचे नाही. यात मोदींचा काही राजकीय आणि देशाच्या अर्थव्यवस्थेचे संतुलन राखण्याचा विषय असू शकेल, जसा त्यांनी परकीय चलनाचा उल्लेख केला. परकीय चलनाची गंगाजळी ही सुस्थितीत असणे हे कुठल्याही देशाच्या अर्थव्यवस्थेची सुदृढ स्थिती मानली जाते. आपला देश हा सुमारे ४५ देशांकडून तेल आयात करतो. सध्या आखाती देशांमधून येणारे तेल आणि गॅस यांच्या पुरवठ्यावर तिथल्या युद्धस्थितीमुळे मोठा परिणाम झालेला आहे. अमेरिका आणि इराण यांच्यातील तणावामुळे तेलवाहतुकीसाठी निर्णायक ठरणार्या होर्मुझच्या सामुद्रधुनीत कोंडी निर्माण झाली आहे. त्यामुळे त्यातून होणारी तेलवाहतूक मंदावली आहे. परिणामी, भारतामध्ये पेट्रोल, डिझेल तसेच गॅसचे दर नियंत्रणात ठेवणे हे मोठे आव्हान ठरत आहे.*

*एक वर्ष परदेशवारी टाळा असे आवाहन मोदींनी देशवासीयांना केले आहे, पण त्याचा पायंडा मोदींना स्वत:च घालून द्यावा लागेल. त्यांनी लोकांना वर्क फ्रॉम होमचे आवाहन केले आहे, त्याच धर्तीवर मोदींनाही देशविदेशातील ज्या विविध नेत्यांशी बैठका घ्यायचा असतात, त्या ऑनलाईन घ्याव्या लागतील. त्यांनी एक वर्षभर सोने खरेदी टाळा, असे आवाहन केलेले आहे, हे आजच्या तारखेला फार महत्त्वाचे आहे. कारण सोने हा भारतीय लोकांचा त्यातही भारतीय महिलांचा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय असतो. त्यात पुन्हा जमीन आाणि सोने या दोन गोष्टी अशा आहेत की, ज्यांचा भाव कधीच कमी होत नाही तो वाढतच जातो. त्यामुळे लोक काटकसर करून या गोष्टींच्या खरेदीला प्राधान्य देतात. आता सामान्य माणसाला जमीन खरेदी करणे शक्य नसते, पण तो काहीही करून थोडेबहुत का होईना, सोने खरेदी करण्याचा प्रयत्न करतो. पण हे सोने खरेदी करताना त्याची प्रचंड आर्थिक पिळवणूक होत असते. विशेषत: लग्नात मंगळसूत्र, हार आणि अंगठी ही खर्या सोन्याची असावी, यावर लोकांचा भर असतो. एक तोळा सोन्याची किंमत सध्या १ लाख ८३ हजार इतकी आहे. या सोन्यापासून दागिना बनवण्याचा, घडणावळीचा खर्च वेगळा असतो.*

*लग्नासाठी इतर गोष्टींवर होणारा मोठा खर्च असतोच, अशा स्थितीत सामान्य माणसाने लग्न कसे करायचे, असा प्रश्न पडतो. त्यामुळे अनेक लोक कर्जबाजारी होत आहेत, त्याला मुख्य कारण सोन्या-चांदीचे वाढते भाव आहेत. त्यामुळे कुणी तरी महत्त्वाच्या व्यक्तीने सोने खरेदीवर आघात करण्याची गरज होती, तो नरेंद्र मोदींनी केली. ते त्यांनी अतिशय मौलिक काम केलेले आहे. मोदींच्या या वक्तव्यामुळे सामान्य माणसाला दिलासा मिळाला आहे. कारण सोने हा भारतीय माणसाचा भावनिक आणि लग्नकार्यात प्रतिष्ठेचा विषय असल्यामुळे त्याची प्रचंड आर्थिक पिळवणूक होते. ज्यावेळी एखाद्या वस्तूची मागणी मोठी असते आणि काहीही करून लोक ती खरेदी करणार हे व्यावसायिकांना माहीत असते, तेव्हा ते त्या वस्तूची किंमत हवी तशी वाढवत नेऊन प्रचंड नफा कमावतात. पण दुसर्या बाजूला सामान्य माणसाची लूट होते त्याचा ते विचार करत नाहीत. आता स्वत: पंतप्रधानांनीच सोने खरेदी करू नका, असे आवाहन केल्यामुळे सोन्याचे मार्केट पडणार आहे. खरेदी घटली की भाव आपोआप उतरतात. त्यामुळे पंतप्रधानांचे हे आवाहन सामान्य माणसांच्या हिताचे असून नफेखोरांवर आघात करणारे आहे.*

*पंतप्रधान मोदींनी भारतीयांना गरजेनुसार इंधन वापरण्याचे आणि ऊर्जा बचतीचे महत्त्वाचे आवाहन केले आहे. हेदेखील अतिशय महत्त्वाचे आहे. कारण आता केवळ शहरातच नव्हे तर गावोगावी लोकांनी दुचाकी, चार चाकी खरेदी केलेल्या आहेत. काहींच्या घरी तर प्रत्येकाची वेगळी चारचाकी गाडी आहे. प्रत्येकजण स्वत:चे वेगळे वाहन वापरत असल्यामुळे इंधनाचा वापर तितक्याच पटींनी वाढत आहे. मागणी वाढल्यामुळे इंधनाचे भावही वाढत जातात. लोक मोठ्या प्रमाणात खासगी वाहने खरेदी करतात, त्यामुळे रस्त्यावर वाहतूक कोंडी होते. मोठ्या प्रमाणात वायू आणि ध्वनी प्रदूषण होते. पृथ्वीवर जी संसाधने आहेत, त्याची वारेमाप उधळपट्टी केली जात आहे. त्या संसाधनांचा आपण जर माफक उपयोग केला तर तो आपल्या आरोग्यासाठी, निसर्गाच्या संवर्धनासाठी उपयुक्त ठरेल.अलीकडच्या काळात अनेक समजुतदार लोक मिनिमल जीवन पद्धतीचा अवलंब करू लागले आहेत. याचा अर्थ अनावश्यक वस्तू, गरजा आणि पसारा कमी करून साधे, अर्थपूर्ण आणि शांतपूर्ण जीवन जगणे. ही जीवनशैली कमी साधनांचा वापर करून दर्जेदार जीवन जगण्याच्या तत्त्वावर काम करते. ज्यामुळे मानसिक शांतता, आर्थिक बचत आणि उत्पादकता वाढते. हे केवळ वस्तूंपुरते मर्यादित नसून विचारांमधील गुंतागुंत कमी करण्यासाठी उपयुक्त आहे. आखाती युद्धात जेव्हा अमेरिका उतरली तेव्हा मोदींनी कोरोनासदृश्य परिस्थितीला सामोरे जायला तयार रहा, असे सूचवले होते. त्यावेळी मोदी कोरोना काळातील नियम लागू करणार की काय, असा संशय व्यक्त होऊ लागला होता, पण तो मोदींनी व्यक्त केलेला पुढील परिस्थितीचा अंदाज होता. आखाती युद्ध हे या सगळ्यांसाठी निमित्त असले तरी ही आपत्ती इष्टापत्ती मानून लोकांनी आपल्या सवयी सुधारल्या तर ते लोकांच्या आणि निसर्गाच्या हिताचेच ठरेल.*

# डॉ. नितीन धांडे हे संयम, शिस्त व संवाद यांचे प्रतीक तथा शैक्षणिक व वैद्यकीय क्षेत्रातील पारंगत व्यक्तिमत्व - पालकमंत्री बावनकुळे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

भाजपा अमरावती शहर जिल्हा अध्यक्ष तथा विदर्भयुथ वेलफेअर सोसायटीचे अध्यक्ष तसेच अमरावती जिल्हा नियोजन समितीचे सदस्य डॉ. नितीन धांडे यांचा वाढदिवस अभिष्टचिंतन सोहळा सर्वपक्षीय नेते मंडळी तथा हजारो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीमध्ये विविध सामाजिक, धार्मिक व जनहिताच्या उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला.

सकाळी अंबादेवी व एकविरा देवी मंदिरात महाआरती करण्यात आली. गोरक्षण संस्थेत लापशी तुला कार्यक्रम पार पडला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच इरविन चौक येथे केक कापून वाढदिवस साजरा करण्यात आला. जिल्हा सामान्य रुग्णालयात रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना फळांचे वाटप करण्यात आले.

मुख्य 'अभिष्ट चिंतन सोहळा' संध्याकाळी संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथील लॉन मध्ये राज्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी खासदार डॉ. अनिल बोंडे, माजी खासदार नवनीत राणा, आमदार प्रताप दादा अडसड, किरण पातूरकर, प्रा. रवींद्र खांडेकर, सुनील वऱ्हाडे , रमेश बुंदिले,प्रदेश प्रवक्ते शिवराय कुलकर्णी यांनी शुभेच्छापर भाषणे केली.डॉ. नितीन धांडे यांना शुभेच्छा देताना माजी खासदार सौ नवनीत राणा यांनी त्यांच्या शैली मध्ये जोरदार फटकेबाजी करत डॉ नितीन धांडे यांनी लवकरात लवकर आमदार व्हावे व त्यांना व्यासपीठावरील सर्वांचा आशीर्वाद मिळावा अशा शुभेच्छा दिल्या,आगामी विधान परिषद निवडणुकीसाठी त्यांच्या उमेदवारीचा गांभीर्याने विचार करावा, असे आवाहन त्यांनी भाजपा नेतृत्वाला केले.प्रमुख अतिथी म्हणून शुभेच्छा देताना पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी डॉक्टर नितीन धांडे यांच्या नेतृत्वाचा उल्लेख करत अमरावती शहराच्या संघटनात्मक बळकटीमध्ये डॉक्टर नितीन धांडे,यांचे महत्त्वपूर्ण योगदान सांगितले,डॉ. धांडे यांच्या जीवनातील अनेक बाबींना स्पर्श करत एक उच्च विभूषित डॉक्टर, विदर्भातील नामांकित शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आणि भारतीय जनता पार्टीचे अध्यक्ष म्हणून डॉक्टर धांडे यांनी त्यांच्या कार्याचा ठसा प्रत्येक क्षेत्रामध्ये कसा उमटविला याबाबत देखील उल्लेख केला,सोबतच त्यांच्या राजकीय भावी वाटचालीला शुभेच्छा देताना डॉ. धांडे यांना भारतीय जनता पार्टी अनेक मोठ्या जबाबदाऱ्या वेळेनुसार देणार



डॉ. धांडे यांनी अमरावतीत भाजपा वाढविण्यासाठी दिलेल्या योगदानाचे कौतुक केले त्यांचे संयमी नेतृत्व, शिस्तबद्ध कार्यपद्धती आणि संवाद कौशल्य प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले. पुढील राजकीय वाटचालीसाठी पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले तसेच डॉक्टर धांडे यांनी राजकीय क्षेत्रामध्ये जे काही स्वप्न बघितले असतील ते सर्व पूर्ण होत अशी आई जगदंबा महालक्ष्मीच्या चरणी प्रार्थना करतो असा उल्लेख देखील बावनकुळे यांनी केलाडॉ. नितीन धांडे यांनी चंद्रशेखरजी बावनकुळे, नवनीतजी राणा डॉअनिलजी बोंडे,तसेच व्यासपीठावरील सर्व नेते मंडळी तथा शुभेच्छा द्यायला आलेले सर्व स्नेही वर्ग व आयोजन समितीचे आभार मानत समाजहित व पक्षवृद्धीसाठी आपले कार्य यापुढेही सुरू ठेवणार असल्याचे सांगितले.यावेळी महापौर श्रीचंद तेजवानी, माजी आमदार प्रवीण पोटे, उपमहापौर सचिन भेंडे, जयंत डेहनकर, रविराज देशमुख,बाळासाहेब हिंगनिकर, डॉ. अविनाश चौधरी, माजी महापौर सौ रीना नंदा कौर,चेतन गावंडे, बादल कुलकर्णी, ललित समदुरकर, सुनील काळे, सचिन रासने, कौशिक अग्रवाल, संजय तिरथकर, संजय नरवणे, राधा कुरिल, ॲड. प्रशांत देशपांडे,राजू कुरिल, चेतन पवार, गगा खारकर, सुरेखा लुगारे, सुधा तिवारी, राजेंद्र मेटे, गजानन देशमुख, प्रवीण वैश्य, कामेश शाहू, ऋषिकेश देशमुख, संध्या टिकले, सुमित पवार,कुसुम शाहू, मिलिंद बांबल, कुणाल टिकले, सुधीर थोरात, प्रवीण उईके, एजाज अख्तर, राजेश आखेगावकर, रीता मोकलकर, राजू राजदेव, शाम पाध्ये, अभिजीत वानखडे, उमेश निलगिरे, सौ. भारती गुहे, संतोष कावरे, विनोद ठोसर, प्रवीण बोके, सचिन नाईक, विनोद तन्वैस, प्रमोद राऊत, मनोज काळे, पंकज गुप्ता, अमोल आगरकर, गणेश खोत, आकाश पाटील, सुमित गुल्हाने, शितल वाघमारे, कल्याणी मुदलियार,अमृत यादव, अशोक नागवाणी, आत्माराम पुरस्वानी, संजय शादी, राजेंद्र बघेल, निलेश काजे, दीपक पोहेकर, सचिन डाके, रविकांत कोल्हे, अश्विन राऊत, विशाल डहाके, राजेश गोफणे, प्रकाश सरदार, अमोल साळुंखे,यांच्यासह अमरावती महानगरपालिकेचे सर्व नगरसेवक, अमरावती जिल्ह्यातील सर्व नगरपालिका नगरपरिषद व नगरपंचायत चे नगराध्यक्ष व नगरसेवक व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महानगरपालिकेला ४७ कोटींच्या जीएसटी परताव्याची आशा

## पालकमंत्री बावनकुळे यांच्या पुढाकारामुळे आर्थिक स्थिती सुधारण्याची चिन्हे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती** आर्थिक अडचणीत अडकलेल्या महानगरपालिकेला आता दिलासा मिळण्याची चिन्हे दिसत आहेत. जीएसटी आणि एलबीटीच्या बदल्यात मिळणाऱ्या अनुदानात वाढ करण्यासाठी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विशेष पुढाकार घेतला असून, येत्या १५ दिवसांत मंत्रालयात मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत महत्त्वपूर्ण बैठक होणार आहे. त्यामुळे अमरावती महापालिकेला ४७ कोटींच्या जीएसटी परताव्याची आशा निर्माण झाली आहे.महानगरपालिकेच्या




आर्थिक स्थितीचा आढावा घेताना बावनकुळे यांनी हा प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिले होते, त्यानुसार आता मंत्रालय स्तरावर विशेष बैठक आयोजित करण्यात येणार असून, त्यामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे तसेच उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह अमरावती विभागातील लोकप्रतिनिधी उपस्थित राहणार असल्याची माहिती आहे. महानगरपालिकेने राज्य शासनाकडे लेखी पत्राद्वारे २०२६-२७ पासून किमान १२ टक्के नैसर्गिक वाढीचा दर अनुदानामध्ये समाविष्ट करण्याची मागणी केली आहे. सध्या महापालिकेची आर्थिक परिस्थितीअत्यंत गंभीर असून, दरमहा सुमारे ४७ कोटी रुपयांच्या अनुदानाची आवश्यकता असल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे. मात्र प्रत्यक्षात केवळ १६ कोटी रुपये मिळत असल्याने विकासकामांवर मोठा परिणाम होत आहे. महानगरपालिकेला अपेक्षित प्रमाणात निधी उपलब्ध झाल्यास प्रलंबित विकासकामांना गती मिळेल तसेच थकीत देणे फेडण्यास मदत होणार आहे. त्यामुळे शहराच्या विकासाला चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. पालकमंत्री बावनकुळे यांच्या पुढाकारामुळे महानगरपालिकेच्या अमरावती आर्थिक पुनरुज्जीवनाच्या आशा बळावल्या असून, होणाऱ्या बैठकीकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

### शेगावच्या गजानन महाराज मंदिर परिसरात

# आता मोबाईलवर बंदी

संस्थानकडून सक्त निर्बंध

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२शेगाव**

श्रीक्षेत्र शेगाव येथील गजानन महाराज मंदिराच्या परिसरातील पावित्र्य व शांतता अबाधित राहण्यासाठी तसेच भाविकांना शांत वातावरणात सुलभ व सुरक्षित दर्शन घेता यावे या हेतूने गजानन महाराज संस्थानने मंदिराच्या परिसरात मोबाईल वापरावर सक्त निर्बंध लागू केले आहेत.



शिस्त, शांतता व स्वच्छतेसाठी प्रसिद्ध असलेल्या श्रींच्या मंदिरात दरदिवशी हजारो भाविकांची दर्शनासाठी गर्दी होत असते. अशावेळी मोबाईलवरून बोलणे, फोटो व व्हिडिओ काढणे अशा प्रकारामुळे नेहमीच्या शांततामय व सुरळीत दर्शन व्यवस्थेवर परिणाम होत असून भाविकांच्या सुरक्षेचाही प्रश्न निर्माण होत आहे. त्यामुळे श्रींच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना मंदिर परिसरात मुख्य प्रवेशद्वारापासूनच आपला मोबाईल बंद ठेवावा लागणार आहे. मंदिर परिसरात कुणी भाविक मोबाईलचा वापर करतांना आढळल्यास त्याचेकडील मोबाईल तात्काळ संस्थानच्या कार्यालयात जमा केला जाणार आहे. ताब्यात घेतलेला मोबाईल परत मिळवण्याच्या प्रक्रियेत भाविकांचा वेळ वाया जाण्याबरोबर मानसिक त्रासही होऊ शकतो हे टाळण्यासाठी तसेच मंदिराच्या परिसरातील शांतता, शिस्त आणि आध्यात्मिक वातावरण कायम राहण्यासाठी भाविकांनी नियमांचे काटेकोर पालन करावे. असे आवाहन गजानन महाराज संस्थान शेगावच्या वतीने करण्यात आले आहे.

# चिखलदरा तालुक्यातील विकास कामांचा जिल्हाधिकाऱ्यांकडून आढावा

## मडकी येथे पर्यटन विकासासह जलसंधारणावर भर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी चिखलदरा तालुक्यातील विविध विकासकामांची प्रत्यक्ष स्थळी जाऊन पाहणी केली. नुकत्याच झालेल्या दौऱ्यादरम्यान त्यांनी सुरू असलेल्या कामांचा दर्जा तपासून सर्व कामे विहित वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश संबंधित विभागांना दिले. मडकी (ता. चिखलदरा) येथे जिल्हा वार्षिक योजना आदिवासी उपाययोजना अंतर्गत सुरू असलेल्या सिमेंट नाला बांधकामाची पाहणी जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी केली. यावेळी त्यांनी जलजीवन मिशन अंतर्गत पूर्ण झालेल्या विहीर व पाण्याच्या टाकीची तसेच अस्तित्वातील पाणीपुरवठा योजनांची सविस्तर माहिती घेतली. मडकी येथील भेटीदरम्यान जिल्हाधिकाऱ्यांनी स्थानिक सरपंच व ग्रामस्थांशी संवाद साधताना महत्त्वपूर्ण सूचना दिल्या. जलसंधारणाची कामे केवळ पाणी साठवण्यापुरती मर्यादित न ठेवता, त्यांचा उपयोग पर्यटन वाढीसाठी आणि परिसराच्या सुशोभीकरणासाठी करावा,



जेणेकरून पर्यटकांना आकर्षित करून स्थानिक रोजगार वाढवता येईल, असे त्यांनी यावेळी सांगितले. तसेच यावेळी मौजे कोहाणा येथे मृद व जलसंधारण विभागामार्फत सुरू असलेल्या कोल्हापुरी पद्धतीच्या बंधाऱ्याच्या (घ.ढ. थशळी) कामाचीही पाहणी करण्यात आली. हे काम तांत्रिक निकषांनुसार आणि दर्जेदार करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या. जिल्हाधिकारी श्री. येरेकर म्हणाले की, सर्व विकासकामे ही नियोजनबद्ध आणि भविष्यातील गरजा लक्षात घेऊन असावीत. जलसंधारणाच्या दर्जेदार कामांमुळे भूजल पातळीत वाढ होऊन त्याचा थेट फायदा शेतकऱ्यांना सिंचनासाठी होईल. पाणीटंचाई दूर करण्यासोबतच ही ठिकाणे पर्यटन स्थळ म्हणून विकसित झाल्यास परिसराचा आर्थिक कायापालट होण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. या पाहणी दौऱ्यात जिल्हा प्रशासनातील विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी, अभियंता व कर्मचारी उपस्थित होते.

# उभ्या ट्रकला थारची जोरदार धडक

## एकाच कुटुंबातील चौघे गंभीर जखमी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

समृद्धी महामार्गावर अपघातांचे सत्र थांबण्याचे नाव घेईना. सोमवारी (दि.११) सकाळी ७ वाजेच्या सुमारास नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील शिवणी गावाजवळ (चॅनल क्र. १०८) भीषण अपघात घडला. भरधाव असलेल्या थार गाडीने उभ्या ट्रकला मागून जोराची धडक दिली. या अपघातात एकाच कुटुंबातील चौघे जण गंभीर जखमी झाले.थार गाडी क्रमांक एम एच४९ - ९४९६) मुंबईहून नागपूरच्या दिशेने अतिवेगाने जात होती. शिवणी गावाजवळ चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने ही गाडी समोर असलेल्या ट्रकवर (क्रमांक उग ०७ उङ ९९६५)मागून आदळली. धडक इतकी भीषण होती की थार गाडीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. या अपघातात एकाच कुटुंबातील रामू सरनागत (३६), रेखा सरनागत, नूर्वी सरनागत (लहान मुलगी) तसेच अन्य एकाचा समावेश आहे.

अपघातानंतर स्थानिक नागरिक आणि महामार्ग पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत मदतकार्य राबवले. जखमींना प्रथम धामणगाव येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे प्राथमिक उपचार केल्यानंतर त्यांना पुढील उपचारासाठी नागपूरला हलवण्यात आले. सध्या त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे समजते.

# धारणी 'विद्युत वितरण उपविभाग' चा कारभार रामभरोसे

# एका वायरमनवर ३० ते ४० गावांचा डोंगराएवढा भार

## वारंवार खंडित वीजपुरवठा, शटडाऊनसाठी तासन्तास प्रतीक्षा शेतकरी, आदिवासी बांधव आणि विद्यार्थ्यांचे जीवन विस्कळीत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२धारणी, –** राज्य शासनाच्या विकासाच्या घोषणा, ग्रामीण विद्युतीकरणाचे दावे आणि डिजिटल भारताचे गोडवे एका बाजूला असताना, दुसरीकडे कुपोषणग्रस्त मेळघाट आजही अंधार, भीती आणि निष्क्रिय प्रशासनाच्या विळख्यात तडफडताना दिसत आहे. विद्युत वितरण उपविभाग धारणीचा कारभार अक्षरशः रामभरोसे सुरू असून, एका वायरमनवर तब्बल ३० ते ४० गावांची जबाबदारी टाकण्यात आल्याने संपूर्ण ग्रामीण व आदिवासी भागातील वीज व्यवस्था कोलमडून पडल्याचे भयावह वास्तव समोर आले आहे.मेळघाटातील डोंगरदऱ्या, जंगल परिसर आणि दुर्गम पाड्यांमध्ये आधीच आरोग्य, शिक्षण, रस्ते व पिण्याच्या पाण्याच्या समस्या गंभीर आहेत. त्यात आता वीज व्यवस्थेतील अराजकतेने परिस्थिती अधिक बिकट बनली आहे. महावितरण विभागातील मोठ्या प्रमाणावरील रिक्त पदे, अपुरा कर्मचारी वर्ग आणि दुर्लक्षित नियोजनामुळे ग्रामीण भागातील नागरिक अक्षरशः संतप्त झाले आहेत. ग्रामीण भागात वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर तक्रार नोंदवूनही चार-चार तास, कधी संपूर्ण दिवस उलटून जातो; मात्र वायरमन घटनास्थळी पोहोचत नसल्याची व्यथा नागरिकांनी व्यक्त केली. अनेक गावांत ट्रान्सफॉर्मर जळणे, तार तुटणे, कमी दाबाचा वीजपुरवठा, अचानक भारनियमन आणि रात्रीचा अंधार ही रोजचीच बाब बनली आहे. शेतीसाठी पंप सुरू होत नसल्याने पिके करपत आहेत, तर शटडाऊन मिळवण्यासाठी शेतकऱ्यांना विनवण्या कराव्या लागत असल्याची संतप्त प्रतिक्रिया ग्रामस्थांनी दिली. वायरमन नाही, अधिकारी फोन उचलत नाहीत, आणि जीव धोक्यात घालून शेती करावी लागते, अशी संतप्त भावना शेतकरी व्यक्त करीत आहेत. सुसर्दा परिसरातील जामपाणी येथे अलीकडेच घडलेली दुर्दैवी घटना संपूर्ण मेळघाटाला हादरवून गेली. ३७ वर्षीय शेतकरी उमेश जावरकर हे शेतीच्या कामासाठी विद्युत खांबावर चढले असता अचानक विद्युत प्रवाह सुरू



झाल्याने त्यांना जबरदस्त करंट लागला आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली असून ग्रामस्थांनी महावितरण प्रशासनाच्या निष्क्रियतेवर संताप व्यक्त केला आहे. वेळेवर शटडाऊन मिळाला असता, किंवा कर्मचारी तत्परतेने उपलब्ध असते तर हा जीव वाचला असता, असे दुःखद उद्गार ग्रामस्थांनी काढले. ग्रामीण भागातील शेतकरी आजही जीव मुठीत धरून विद्युत तारांच्या सावटाखाली काम करत असल्याचे भीषण वास्तव या घटनेने पुन्हा एकदा समोर आणले आहे. मेळघाट आधीच बालमृत्यू, कुपोषण आणि अपुऱ्या आरोग्य सुविधांमुळे देशभर चर्चेत राहिले आहे. अनेक दुर्गम गावांमध्ये प्राथमिक आरोग्य केंद्रे अपुरी आहेत. त्यात सततच्या वीजखंडितीमुळे औषध साठवण, लसीकरण व्यवस्था आणि उपचार प्रक्रियेवर गंभीर परिणाम होत असल्याचे चित्र आहे. रात्री अपरात्री वीज नसल्याने गर्भवती माता, नवजात बालके आणि वृद्धांची अवस्था अधिक बिकट होत आहे. विद्यार्थ्यांचे शिक्षण अंधारात चालले असून अनेक आदिवासी पाड्यांमध्ये मोबाईल नेटवर्कसुद्धा ठप्प होत असल्याने आपत्कालीन परिस्थितीत नागरिक पूर्णतः असहाय्य बनतात.

### रिक्त पदे तातडीने भरा; आक्रमक मागणी !

स्थानिक नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि शेतकरी संघटनांनी महावितरण प्रशासनाकडे तातडीने रिक्त पदे भरण्याची मागणी केली आहे. प्रत्येक पाच ते दहा गावांमागे स्वतंत्र वायरमन नियुक्त करावा, आपत्कालीन पथके स्थापन करावीत, तसेच शटडाऊन प्रक्रिया तत्काळ आणि पारदर्शक करावी, अशी मागणी जोर धरत आहे. मेळघाटातील नागरिकांचा जीव इतका स्वस्त आहे का? असा संतप्त सवाल आता जनतेतून उपस्थित केला जात आहे. शासनाने तातडीने लक्ष न दिल्यास मेळघाटातील वीज व्यवस्थेचा हा बोजवारा भविष्यात आणखी भीषण स्वरूप धारण करू शकतो, अशी भीती व्यक्त होत आहे.

### एक वायरमन... चाळीस गावे

मेळघाटातील बिकट भौगोलिक परिस्थिती लक्षात घेता प्रत्येक काही गावांमागे स्वतंत्र वायरमन असणे आवश्यक असताना प्रत्यक्षात एका कर्मचाऱ्यावर डोंगररांगांतील ३० ते ४० गावांची जबाबदारी टाकण्यात आली आहे. त्यामुळे तांत्रिक बिघाड त्वरित दुरुस्त करणे अशक्य बनले असून अनेक गावांना दिवसन्दिवस अंधार सहन करावा लागत आहे. वीज खंडित झाल्यानंतर नागरिकांना कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागतात. काही ठिकाणी नागरिकांनी स्वतः जीव धोक्यात घालून तार दुरुस्ती करण्याचा प्रयत्न केल्याच्याही घटना घडत आहेत. ही परिस्थिती अत्यंत धोकादायक असून प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे भविष्यात मोठ्या दुर्घटना घडण्याची भीती व्यक्त होत आहे.

# राष्ट्रवादीचे नगरसेवक मनिष बजाज यांचे जात प्रमाणपत्र रद्द करण्याचे आदेश

### उपविभागीय अधिकारी अकोट यांच्याकडून प्रकरण जात पडताळणी समिती कडे वर्ग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**
अमरावती महानगर पालिकेतील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटाचे नगरसेवक मनिष उर्फ मुलचंद बजाज यांचे ओबीसी जात प्रमाणपत्र रद्द करण्याबाबतचे आदेश उपविभागीय अधिकारी अकोट यांनी दिले असुन पडताळणी समिती अकोला यांच्याकडे वर्ग करण्यात आले आहे. त्यामुळे मनिष बजाज यांचे नगरसेवक पद धोक्यात आले आहे. पुढील कारवाईसाठी हे प्रकरण राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटाचे नगरसेवक मनिष बजाज यांच्या ओबीसी जात प्रमाणपत्रासंदर्भात अर्जदार विष्णू बन्सीलाल व्यास



यांनी उपविभागीय अधिकारी आकोट यांच्याकडे तक्रार करून जात मनिष बजाज यांचे ओबीसी जात प्रमाणपत्र बनावट असल्याचे नमुद केले होते.उपविभागीय अधिकारी अकोट यांनी चौकशी अंती आदेश पारीत केले आहे. त्यामध्ये १) आक्षेप कर्ता यांच्या आक्षेपअर्जातील काही मुद्यात तथ्य आहे.

२. निर्गमीत जात प्रनणपत्र रद्द करणेही बाब जिल्हा जात प्रमाणपत्रसमिती अकोला यांचेकडील असल्याने सदर आदेश जात प्रमाणपत्र रद्द करण्या करीता पाठविण्यात येत आहे. असे आदेशात नमुद केले आहे. तसेच अर्जदार यांनी या बाबत सबंधीत विभागाकडे दाद मागावी अशी सुचना सुध्दा आदेशात करण्यात आली आहे.

# झोन क्र. ३ मध्ये इस्माईल लालुवाले यांचा पदग्रहण सोहळा उत्साहात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**
अमरावती महानगरपालिका अंतर्गत झोन क्र. ३ मध्ये बहुजन समाज पार्टीचे नगरसेवक इस्माईल कासम लालुवाले यांच्या पदग्रहण सोहळ्याचा कार्यक्रम सोमवारी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाचे संचालन बांधकाम विभागातील कनिष्ठ सहाय्यक अभियंता चैतन्य काळे यांनी केले. सहायक आयुक्त नितीन बोबडे व शेखर सोनकांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या प्रसंगी महापौर श्रीचंद तेजवानी, उपमहापौर



सचिन भेंडे, स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे गटनेते राजेंद्र तायडे यांच्यासह विविध पक्षांचे नगरसेवक उपस्थित होते. शिवसेना, बहुजन समाज पार्टी, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), युवा स्वाभिमान पक्ष तसेच एमआयएम पक्षाचे पदाधिकारी व नगरसेवकांनीही कार्यक्रमाला हजेरी लावली.यावेळी नानाभाऊ आमले, शेख हमीद, फिरोज खान कातिब, दिनेश बुब,



सचिन वैद्य, विद्या माटे तसेच विविध समित्यांचे सभापती, उपसभापती आणि प्रभाग क्रमांक ८, ९, १० व ११ मधील नगरसेवक उपस्थित होते. बसपाच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून इस्माईल लालुवाले यांचे स्वागत केले. कार्यक्रमात सर्व मान्यवरांनी नव्या जबाबदारीसाठी शुभेच्छा देत विकासकामांना गती देण्याचा विश्वास व्यक्त केला.

# व्यापारसंकुल भाडेवाढीचा प्रस्ताव रखडलेलाच

## व्यापारी शिष्टमंडळासोबत चर्चा करणार, जूनमध्ये भाडेवाढीचा प्रस्ताव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**
महापालिकेच्या उत्पन्नात भर घालू शकणारा व्यापारसंकुलाच्या भाडेवाढीच्या प्रस्तावावर काहीच निर्णय झाला नाही. याउलट हा प्रस्ताव पुनर्विचारासाठी स्थगित ठेवण्यात आल्याचे पत्र नगरसचिवांनी प्रशासनाला पाठविले आहे. यामुळे या मुद्द्यावर नेमके काय, असा प्रश्न निर्माण झाला. तथापि, पालकमंत्र्यांनी सुचविलेल्या तीनपैकी एका प्रस्तावावर निर्णय घेण्याचा विचार करण्यात येत



असून जून महिन्यातील आमसभेत अंतिम निर्णयासाठी तो मांडण्यात येणार आहे. २०१८ पासून हा मुद्दा रखडलेला आहे, हे विशेष. चार व्यापारसंकुलातील गाळ्यांच्या भाडेवाढीचा मुद्दा आठ वर्षांपासून रखडलेला आहे. भाडे नियंत्रण समितीने निर्धारित केलेले भाडेदर व्यापाऱ्यांनी अमान्य केला आहे. सभागृह अस्तित्वात आल्यानंतर १७ मार्च २०२६ ला झालेल्या आमसभेत प्रशासनाने मांडलेला प्रस्ताव स्थगित ठेवण्यात आला. स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर यांनी नागपूर महापालिकेच्या धर्तीवर गाळ्यांच्या लिलावाचा प्रस्ताव मांडला आहे. पालकमंत्री बावनकुळे यांनीही या प्रस्तावाचे समर्थन करीत ०.७ टक्के दराने भाडेवाढ करणे व पुनर्निमाण करण्याचा प्रस्ताव दिला आहे. आमसभेत यापैकी एकाही प्रस्तावावर सहमती न झाल्याने तो स्थगित ठेवण्यात आला. त्यानंतर आता नगरसचिवांनी भाडेवाढीचा प्रस्ताव पुनर्विचारासाठी स्थगित ठेवण्यात आल्याचे पत्र बाजार व परवाना विभागास पाठविले आहे.

नागपूर महापालिकेच्या धर्तीवर गाळयांचा लिलाव करून हा मुद्दा कायमस्वरूपी निकालात काढावा व येणाऱ्या पैशांतून मनपाच्या अन्यत्र असलेल्या जागेवर संकूल उभारून नवीन आर्थिक स्रोत निर्माण करावे.
**– अविनाश मार्डिकर,** स्थायी समिती सभापती.

# अंजनगाव तालुक्यात सर्रास हिरव्यागार झाडांची वृक्षकटाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अंजनगाव सुर्जी**
अंजनगाव सुर्जी तालुक्यात सर्वात मोठ्या प्रमाणात सर्रास अवैध वृक्षकटाई होत असून संबंधित शासकीय अधिकारी कोणतीही कारवाई करीत नसल्याने तस्करांना रान मोकळे झाले आहे.

याबाबत माहिती अशी की, अंजनगाव सुर्जी तालुक्यातील चौसाळा, निमखेड, कोकर्डा, सातेगाव , भंडाराज, धनेगाव, बोराळा, विहिगाव, चिंचोली तसेच अचलपूर तालुक्यातील शिंदी, कोल्हा- काकडा या शिवारांमधून बंगाली बाभळीचे झाड, कडूनिंब, आडजातीच्या झाडाची मोठ्या प्रमाणात कटाई होत असून कटाई केलेला माल



मालवाहू गाडीने बिनधास्त शहरातील काही आरामशीनवर अधिकार्यांच्या आशीर्वादाने येत आहे. महसूल अधिकारी, मंडल अधिकारी, तलाठी त्याचप्रमाणे वन विभागाचे व पोलिस विभागाचे अधिकारी हे काहीच कारवाई करीत नसल्याची ओरड जनतेत आहे.वृक्षकटाईच्या तस्करीमध्ये शहरातील काही तस्करांचा सहभाग मोठा असून हे तस्कर सकाळपासून जंगलातील माल शोधून त्याबाबतचे वृक्षकटाईचे नियोजन आखत असतात. या तस्करांचे मधुर संबंध काही अधिकारी व कर्मचार्यांसोबत असल्याची चर्चा सुद्धा शहरात असून संपूर्ण तालुक्यातून वृक्षकटाईचा माल दिवसाढवळ्या शहरात येत असताना अधिकारी व कर्मचारी कारवाई का करत नाही, असा संतप्त सवाल जनतेत केल्या जात आहे. यामुळे महसूल प्रशासन तसेच वन विभागाच्या कर्तव्यदक्षतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. वन विभागाच्या तसेच महसूल विभागाच्या वरिष्ठ अधिकार्यांनी शहरातील व ग्रामीण भागातील आरामशीनवर येणार्या मालाची तपासणी मोहीम सुरू करण्याची मागणी जनतेत केल्या जात आहे. त्याचप्रमाणे या गंभीर प्रकाराकडे वरिष्ठ अधिकार्यांनी लक्ष देणे गरजेचे असून अवैध झाडाच्या कटाईविरुद्ध पोलिसांनी सुद्धा कारवाई करण्याची गरज आहे.

# एमआयएमच्या नगरसेविकेस तीन अपत्य

## पराभूत उमेदवाराकडून आक्षेप, अपात्र ठरविण्याची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२अमरावती–** महापालिकेतील एमआयएम पक्षाच्या तिसऱ्या नगरसेवकाविरुद्ध अपात्रतेची कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. प्रभाग क्रमांक १६ अलीम नगर-रहमतनगर येथील नगरसेविका बीबी बतूल शाह यांनी त्यांना तिसरे अपत्य असल्याची माहिती शपथपत्रात लपवून ठेवल्याचा आरोप करण्यात आला असून महापालिका आयुक्तांकडे यासंदर्भात तक्रार करण्यात आल्याची माहिती पत्रकार परिषदेत एजाज अहमद यांनी दिली. नगरसेविका बीबी बतूल शाह यांना तीन अपत्ये असून महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत त्यांनी अलीमनगर-रहमतनगर या प्रभागातून एमआयएम पक्षाकडून निवडणूक लढविली आहे. यामध्ये त्या विजयी झाल्या असून निवडणूक नामांकन दाखल करताना शपथपत्रात त्यांनी त्यांना दोनच अपत्य असल्याची माहिती दिली आहे. यावर पराभूत उमेदवार शहनाज अ. कदीर यांनी आक्षेप घेतला आहे. महापालिका आयुक्तांसह जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्तांकडे केलेल्या तक्रारीत नगरसेविका बीबी अतूल शाह यांना तीन अपत्य असून ही माहिती लपवून ठेवल्याचा आरोप केला आहे. त्यांना १४ सप्टेंबर २००९ व १५ नोव्हेंबर २०२१ ला झालेल्या अपत्यांची माहिती दिली असून १६ सप्टेंबर २००८ ला झालेल्या अपत्याची माहिती दिली नसल्याचे म्हटले आहे. १२ सप्टेंबर २००१ नंतर तिसरे अपत्य झाल्यास संबंधित नगरसेवकास अपात्र ठरविण्याची तरतूद असून त्यानुसार नगरसेविका बीबी अतूल शाह यांना अपात्र ठरविण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. एजाज अहमद अ. कदीर यांनी तक्रार करून आठवडा झाला असतानाही त्यावर काहीच कारवाई करण्यात आली नसल्याचे त्यांचा आरोप आहे. मनपा आयुक्तांनी तातडीने या तक्रारीची दखल घेत कारवाई करण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे. यापूर्वी एमआयएमच्या दोन नगरसेवकांविरुद्धही अपात्र ठरविण्यासंदर्भात तक्रारी दाखल आहेत, हे विशेष.

# खड्ड्यांच्या विळख्यात सापडला वरुड-तळेगाव श्यामजीपंत राज्यमहामार्ग

## टेंडर निघाले..पण वनविभागाच्या काही परवानगी बाकी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२वरुड–** वरुड-तळेगाव श्यामजीपंत यावर प्रचंड प्रमाणात खड्डे पडले असून रस्त्याची चाळण झाली आहे. जागोजागी पडलेल्या खोल खड्ड्यांमुळे नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत असून प्रशासन मात्र याकडे दुर्लक्ष करीत आहे. पुलगाव-आमला मिल्ट्री महामार्गातील वरुड-तळेगाव या राज्य महामार्गाची दर्जोन्नती होऊन पूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून आता राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३४७ (अ) झाला. या महामार्गाची देखभाल दोन वर्षांपासून महामार्ग विभागाकडे आहे. हा महामार्ग राजुराबाजारसह वाडेगाव, गाडेगाव, वघाळ, वंडली, हातूर्णासह वर्धा, नागपूर



जिल्ह्याशी थेट जोडलेला असल्याने परिसरातील नागरिकांची मोठी वर्दळ याच रस्त्यावरून असते. राजुराबाजार ही प्रमुख बाजारपेठ असल्याने शेतकरी, व्यापारी, विद्यार्थी, शाळकरी विद्यार्थी आणि वृद्ध यांनाही या खड्डेमय रस्त्याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. या रस्त्याच्या दुरवस्थेबाबत भाजप नेते माजी सभापती विक्रम ठाकरे यांनी रास्तारोको आंदोलन करून अवगत केले होते. राजुराबाजार ते हातूर्णा, या आठ किलोमीटर रस्त्याची अवस्था अतिशय दयनीय झाली असून खड्ड्यांत रस्ता की रस्त्यात खड्डा, असा प्रश्न प्रवाशांना पडला आहे. हा रस्ता राष्ट्रीय महामार्ग विभागाकडून दुर्लक्षित झाला असून काटेरी झुडुपे रस्त्यावर आली आहेत. दिशादर्शक फलक नसल्याने समोरून येणाऱ्या वाहनांचा अंदाज येत नाही. रस्त्यावर खड्ड्यांतील गिट्टी रस्त्यावर आल्याने वाहनांचे संतुलन बिघडत आहे. जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागतो. रात्रीच्या वेळी वाहनचालकाचा अंदाज चुकतो व अपघात होतो. अनेक वाहन चालकांना मानेचा आजार जडला असून दररोज कुठे ना कुठे अपघात होत आहे. विशेष म्हणजे महामार्गावरील राजुराबाजार हे गाव संत्रा, मोसंबी, हिरवी मिरचीसाठी जगभर ओळखले जाते. आठवडी बाजार, जिल्ह्यातील सर्वात मोठा गुरांचा बैलबाजार, अन्नधान्याची मोठी बाजारपेठ प्रसिद्ध आहे. निदान राजुराबाजार ते हातूर्णा या आठ किलोमीटरच्या रस्त्याचे काम पावसाळ्यापूर्वी सुरू करावे, अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.

रस्त्याची दुर्दशा झाल्याने या रस्त्याला वर्षभरापूर्वी मंजुरी मिळाली आहे. टेंडरही निघाले, फक्त वनविभागाच्या काही परवानगी बाकी राहिली आहे. त्यानंतरच प्रत्यक्ष कामाला सुरवात होईल. –शुभम देशमुख, शाखा अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, अमरावती.

# चांदूर रेल्वे पोलिसांची मोठी कारवाई

## १.०१ कोटींचा अवैध गुटखा जप्त

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१२चांदूर रेल्वे

अमरावती ग्रामीण जिल्ह्यात अवैध गुटखा व सुगंधी तंबाखू वाहतुकीविरोधात चांदूर रेल्वे पोलिसांनी मोठी कारवाई करत तब्बल १ कोटी १ लाख ३५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई मंगळवारी (१२ मे) पहाटे गुप्त माहितीच्या आधारे करण्यात आली.पोलीस अधीक्षक अमरावती ग्रामीण निकेतन कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन चांदूर रेल्वे येथील पथकाने मालखेड गावाच्या हद्दीत नाकाबंदी करून चक ०१ उत ४९६२ क्रमांकाचा ट्रक पकडला. पोलिसांनी ट्रकची तपासणी केली असता त्यामध्ये मोठ्या प्रमाणात अवैध गुटखा व सुगंधी तंबाखूचा साठा आढळून आला.या



प्रकरणी ट्रक चालक शेख इमरान शेख मुस्कान (वय ३६, रा. पठाण चौक, अमरावती) याला ताब्यात घेण्यात आले. पोलिसांनी ट्रकमधून अंदाजे १० टन गुटखा, ज्याची किंमत सुमारे ७५ लाख ७५ हजार रुपये आहे, असा साठा जप्त केला. तसेच २५ लाख रुपयांचा मालवाहू ट्रक आणि ६० हजार रुपये किंमतीचे दोन मोबाईल फोन असा एकूण १,०१,३५,००० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.सदर प्रकरणात एक आरोपीला अटक करण्यात आली असून आणखी तीन ते चार आरोपी फरार असल्याची माहिती पोलिसांनी दिली. फरार आरोपींचा शोध सुरू असून संबंधितांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही कारवाई अप्पर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड, डउझज अनिल पवार, पोलीस निरीक्षक अजय आकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि विना पंडे, रोहित कुदळे, नीतेश आझाडे तसेच चांदूर रेल्वे पोलिसांच्या पथकाने संयुक्तरीत्या पार पाडली. पुढील तपास चांदूर रेल्वे पोलीस करत आहेत.-

# कोणार्क कंपनीविरोधात अमरावती महानगरपालिकेत चालक कर्मचाऱ्यांचे आंदोलन

### पाच महिन्यांपासून वेतन रखडल्याने संताप; PF, SIS सुविधांबाबतही तक्रारी

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१२अमरावती

अमरावती महानगर पालिकेच्या सफाई विभागात कार्यरत असलेल्या कोणार्क कंपनीविरोधात वाहन चालक कर्मचाऱ्यांचा संताप उफाळून आला असून विविध मागण्यांसाठी चालकांनी कामबंद आंदोलन सुरू केले आहे. वेतन थकबाकी, झक्र आणि डखड सुविधांमधील त्रुटी तसेच नवीन वाहनांच्या आश्वासनाची पूर्तता न झाल्यामुळे सुमारे १०० चालक कर्मचाऱ्यांनी इरविन चौक येथे ठिय्या आंदोलन सुरू केले आहे.मिळालेल्या माहितीनुसार, डिसेंबर महिन्यापासून कोणार्क कंपनीकडे महानगरपालिकेच्या सफाई विभागाचा ठेका देण्यात



आला होता. मात्र गेल्या पाच महिन्यांपासून अनेक चालक कर्मचाऱ्यांना नियमित वेतन मिळाले नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच झक्र आणि डखड योजनेत अनेक कर्मचाऱ्यांची नावे समाविष्ट करण्यात आलेली नाहीत, त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.आंदोलनकर्त्या चालकांचे म्हणणे आहे की, कंपनीकडून नवीन वाहने उपलब्ध करून देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र प्रत्यक्षात अद्याप नवीन वाहने सुरू करण्यात आलेली नाहीत. त्यामुळे जुनी व जीर्ण वाहने वापरूनच सफाई व्यवस्था चालवावी लागत असून काम करताना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.दरम्यान, आंदोलनाची माहिती मिळताच अमरावती महानगरपालिकेचे उपमहापौर सचिन भेंडे तसेच नगरसेवक प्रशांत वानखडे यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन कर्मचाऱ्यांशी चर्चा केली. कर्मचाऱ्यांच्या समस्या जाणून घेत प्रशासन स्तरावर योग्य तो तोडगा काढण्याचे आश्वासन त्यांनी दिले.आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, थकीत वेतन, झक्र, डखड आणि इतर प्रलंबित मागण्यांवर तातडीने निर्णय न घेतल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल. दरम्यान, या संपूर्ण प्रकरणावर कोणार्क कंपनीकडून अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही.

# निवडणुका लांबल्याने उमेदवारांचा हिरमोड

### जनसंपर्कासाठी केलेल्या खर्चामुळे इच्छुकांचे खिसे झाले रिकामे

अरुण जोशी
विदर्भ प्रजासत्ताक
दि.१२ अमरावती

तालुक्यासह ग्रामीण भागात गेल्या अनेक महिन्यांपासून जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांची चर्चा रंगत असताना निवडणुका मात्र सतत लांबणीवर पडत असल्याने भावी उमेदवारांचा चांगलाच हिरमोड झाला आहे.

जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुका कधीही जाहीर होतील या अपेक्षेने अनेक इच्छुक उमेदवारांनी गावोगावी जनसंपर्क वाढवीत विविध सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमात आर्थिक सहभाग नोंदविला. मात्र निवडणुकीच्या तारखा जाहीर न झाल्याने आता अनेक भावी उमेदवारांचे खिसे रिकामे झाल्याची चर्चा सुरू आहे. मागील काही महिन्यांपासून गावातील दुर्गोत्सव, गणपती उत्सव, यात्रा-महोत्सव, क्रीडा स्पर्धा, भजन-कीर्तन कार्यक्रम, सामाजिक मेळावे, सत्कार समारंभ तसेच युवक मंडळांच्या उपक्रमांना भावी उमेदवारांकडून मोठ्या प्रमाणात वर्गणी देण्यात आली. काही इच्छुकांनी गावागावात बॅनरबाजी, वाढदिवस शुभेच्छा फलक, तसेच कार्यकर्त्यांच्या बैठका



यावरही मोठा खर्च केला. विशेष म्हणजे अनेकांनी मतदारांशी जवळीक वाढविण्यासाठी लग्नसमारंभ, अंत्यविधी, धार्मिक कार्यक्रम तसेच विविध सामाजिक उपक्रमात सातत्याने उपस्थिती दर्शविली. कार्यकर्त्यांची नाराजी होऊ नये म्हणून वाहन खर्च, भोजन व्यवस्था व इतर कार्यक्रमांवरही मोठया प्रमाणात खर्च करण्यात आला. काहींनी तर निवडणूक डोळ्यासमोर ठेवून कर्ज काढून खर्च केल्याची चर्चा देखील राजकीय वर्तुळात रंगत आहे. अनेकांनी उमेदवारी पदरात पाडून घेण्यासाठी ऐनवेळी पक्ष बदल करून नेत्यांची मनधरणी केली. मात्र, निवडणुका लांबणीवर गेल्याने हा सर्व खर्च वाया गेल्याची भावना अनेक भावी उमेदवारांत निर्माण झाली आहे. राज्यातील प्रभाग रचना, आरक्षणाचा प्रश्न तसेच न्यायालयीन प्रक्रियेमुळे निवडणुका रखडल्याचे सांगितले जात असले तरी याचा मोठा आर्थिक फटका ग्रामीण भागातील इच्छुक उमेदवारांना बसत आहे. दरम्यान, निवडणुकांच्या प्रतीक्षेत असलेल्या कार्यकर्त्यांमध्येही संभ्रमाचे वातावरण आहे. निवडणुका नेमक्या कधी लागणार? हा प्रश्न आता सर्वसामान्य नागरिकांपासून भावी उमेदवारांपर्यंत चर्चेचा विषय ठरत आहे. त्यामुळे राज्य शासन व निवडणूक आयोगाने लवकरात लवकर निवडणुकांबाबत स्पष्ट भूमिका घ्यावी, अशी मागणी ग्रामीण भागातून होत आहे.

# ऑनलाइन पैसे भरूनही ग्राहकाला गॅस सिलेंडर नाही

### नितेश गॅस एजन्सीच्या कारभारावर पुन्हा प्रश्नचिन्ह

### कोर्टाच्या आदेशानंतर एनसीआर दाखल, चौकशी सुरू

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१२अमरावती :

१७अमरावती जिल्ह्यातील वलगाव येथील नितेश गॅस एजन्सीचा कारभार पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. ऑनलाइन गॅस बुकिंग करून पैसे भरल्यानंतरही सिलेंडर मिळाला नसल्याची तक्रार ग्राहकाने केली असून या प्रकरणात न्यायालयाच्या आदेशानंतर एनसीआर दाखल करण्यात आला आहे. त्यामुळे एजन्सीच्या कामकाजावर गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, किशोर वासुदेवराव धर्माळे यांनी



१४ एप्रिल २०२६ रोजी ऑनलाइन पद्धतीने गॅस सिलेंडर बुक केला होता. त्यासाठी आवश्यक रक्कमही ऑनलाइन भरली होती. मात्र, अनेक दिवस उलटूनही सिलेंडर मिळाला नसल्याने त्यांनी एजन्सीकडे संपर्क साधला. त्यावेळी एजन्सीकडून तुम्ही सिलेंडर आधीच घेऊन गेले आहात, असे सांगण्यात आल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

यानंतर संबंधित ग्राहकाने एजन्सी कार्यालयात जाऊन विचारणा केली असता समाधानकारक उत्तर मिळाले नाही. उलट कर्मचाऱ्यांकडून उडवाउडवी ची उत्तरे देण्यात आल्याचे सांगितले जात आहे. अखेर ग्राहकाने न्यायालयात धाव घेतली. न्यायालयाच्या आदेशानंतर पोलिसांनी एनसीआर दाखल करून प्रकरणाची चौकशी सुरू केली आहे. या घटनेमुळे परिसरातील ग्राहकांमध्ये नाराजी व्यक्त होत असून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे.-

# अमरावती ट्रॅफिक पोलिसांना ‘कूलिंग जॅकेट’चा दिलासा

### उन्हात ड्युटी करणाऱ्या कर्मचाऱ्यांना मोठा आधार

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१२अमरावती- अमरावती शहरातील वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर ट्रॅफिक पोलिसांना आता ‘कूलिंग जॅकेट’चा दिलासा मिळाला आहे. भर उन्हात चौकाचौकात उभे राहून वाहतूक नियंत्रण करणाऱ्या पोलिस कर्मचाऱ्यांसाठी ही जॅकेट उपयुक्त ठरत असल्याचे चित्र दिसून येत आहे.उन्हाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असताना ट्रॅफिक पोलिसांना दीर्घकाळ रस्त्यावर उभे राहून काम करावे लागते. अशा परिस्थितीत उष्माघात, थकवा आणि शरीरातील पाण्याची कमतरता यांसारख्या समस्या निर्माण होतात. यावर उपाय म्हणून काही ट्रॅफिक कर्मचाऱ्यांना कूलिंग जॅकेट उपलब्ध करून देण्यात आले आहेत.या जॅकेटमुळे शरीराचे तापमान नियंत्रित राहण्यास मदत होत असून उन्हाचा त्रास कमी जाणवत असल्याची



प्रतिक्रिया कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली.ट्रॅफिक हवालदार अमित गोफणे यांनी सांगितले की, खरोखरच या प्रचंड गर्मीत कूलिंग जॅकेटचा मोठा फायदा होत आहे. सतत उन्हात ड्युटी करताना शरीराला थंडावा मिळत असल्याने काम करणे सोपे जात आहे.या उपक्रमामुळे ट्रॅफिक पोलिसांच्या आरोग्याची काळजी घेतली जात असल्याने कर्मचाऱ्यांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

# ज्ञानभारतम् राष्ट्रीय हस्तलिखित सर्वेक्षण मोहिमेला प्रारंभ

### जिल्हाधिकाऱ्यांचे नागरिकांना सहभागाचे आवाहन

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१२अमरावती,

भारताचा समृद्ध आणि मौल्यवान हस्तलिखित वारसा जतन करण्यासाठी केंद्र शासनाच्या संस्कृती मंत्रालयाच्या वतीने ज्ञानभारतम् या महत्त्वाकांक्षी मोहिम राबविण्यात येत आहे. या योजनेत देशभरातून एक कोटीहून अधिक हस्तलिखितांचा शोध व नोंदणी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या मोहिमेत जिल्ह्यातील नागरिकांनी सहभाग नोंदवा, असे आवाहन करण्यात आले आहे. भारताला हस्तलिखितांचा मोठा वारसा लाभलेला आहे. ही हस्तलिखिते विविध ठिकाणी विखुरलेल्या स्वरूपात आहेत. हे सर्व ज्ञानभंडार एकत्र करून एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या अंतर्गत हस्तलिखितांचे सर्वेक्षण, दस्तऐवजीकरण, संवर्धन, डिजिटायझेशन व प्रसार केला जाणार आहे. यात हस्तलिखितांचा 'राष्ट्रीय डिजिटल संग्रह' तयार करण्यात येणार आहे. या प्रक्रियेत हस्तलिखितांची मालकी ही मूळ संस्था, ग्रंथालय किंवा खासगी संग्राहक यांच्याकडेच राहणार आहे. मात्र, स्वखुशीने ही हस्तलिखिते शासनाकडे सुपूर्द करायची असल्यास शासन स्विकारणार आहे.या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यात विविध सांस्कृतिक संस्था व विद्यापीठांच्या सहकार्याने ही मोहीम राबवली जात आहे. प्रकल्पासाठी राज्याची नोडल संस्था म्हणून पुराभिलेख संचालनालयाची नियुक्ती



करण्यात आली आहे. या सर्वेक्षणासाठी ग्यान भारतम् हे विशेष मोबाईल ॲप विकसित करण्यात आले आहे. त्याद्वारे हस्तलिखितांचे मूल्यांकन, पडताळणी व दस्तऐवजीकरण केले जाणार आहे. जिल्हा स्तरावर देखील जिल्हा नोडल अधिकारी आणि जिल्हास्तरीय समितीच्या माध्यमातून विविध मंदिरे, मठ, शैक्षणिक संस्था व खासगी संग्राहकांना या मोहिमेत जोडून घेतले जात आहे. या मोहिमेत विद्यार्थी, संशोधक, पारंपरिक पंडित, एनसीसी आणि एनएसएसच्या स्वयंसेवकांचा सक्रिय सहभाग राहणार आहे. नागरिकांकडे अथवा संस्था, मंदिरे, ग्रंथालये किंवा खासगी संग्रहात जुनी हस्तलिखिते उपलब्ध असल्यास, त्याची माहिती ग्यान भारतम् या मोबाईल ॲपवर अपलोड करावीत. या अमूल्य ज्ञानवारशाचे जतन करण्याच्या कार्यात नागरिक, संस्था आणि संशोधकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# नियोजनचा निधी तातडीने खर्च होण्यासाठी प्रयत्न करावेत-जिल्हाधिकारी येरेकर

विदर्भ प्रजासत्ताकदि.१२अमरावती,

२७चालू आर्थिक वर्षासाठी जिल्हा नियोजनला ६०५ कोटी रूपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. सध्यास्थितीमध्ये प्राप्त निधीच्या खर्चासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात येतील. त्यामुळे यंत्रणांनी जिल्हा नियोजनचा निधी तातडीने खर्च होण्यासाठी प्रयत्न करावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले.

महसूल भवनातील बैठकीला जिल्हा नियोजन अधिकारी वर्षा भाकरे यांच्यासह यंत्रणांचे प्रमुख उपस्थित होते. जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी सुरुवातीला जिल्हा नियोजनच्या बैठकीमधील उपस्थित मुद्यांबाबत अनुपालन अहवालाबाबत माहिती घेतली. त्यानंतर यावर्षी मंजूर निधीपैकी ६० टक्के निधी प्राप्त झाला असल्याने प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही सुरू करण्यात येणार आहे. त्यामुळे यंत्रणांनी तातडीने याबाबत कार्यवाही सुरू करावी. येत्या जूनमध्ये प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.



प्रशासकीय मान्यता घेताना कामाच्या याद्यांबाबत लोकप्रतिनिधींना विश्वासात घ्यावे. त्यानंतर प्रस्ताव सादर करावेत. जिल्हा नियोजनच्या कामांना एमएच-यूडीआयडी क्रमांक देण्यात येणार आहे. त्यामुळे ही कार्यवाही तातडीने पूर्ण करण्यात यावी.

प्रशासकीय मान्यता दिलेला निधी याच वर्षी खर्च होईल, याची दक्षता घ्यावी. शासनाने व्हीपीडीए यंत्रणा दिलेली असली तरी यात असलेला निधी वर्षभरातच वापरावा लागणार आहे. त्यानंतर यातील निधी आपोआप व्यपगत होत असल्याने याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. जिल्हा नियोजनमधून केलेल्या कामांना कार्यालय प्रमुखांनी भेटी द्याव्यात. यात कामाचा दर्जा तपासण्यात यावा. जिल्हा परिषद आणि अन्य यंत्रणांना निधी दोन वर्षे खर्च करण्याची परवानगी आहे. त्यामुळे गेल्यावर्षीची कामे तातडीने पूर्ण होतील, याची काळजी घ्यावी. तसेच सेवा हक्क अधिनियमात अधिसूचित सेवा विहित कालमर्यादेत देण्यात यावा. याबाबत कार्यालयाला प्राप्त अर्ज निकाली काढावेत. याबाबत नियमित आढावा घेण्यात यावा, असे निर्देशही जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी दिले.

# अमरावती बाजार समितीत लिंबू दर कोसळले

### आठ दिवसांत ५० टक्क्यांनी घसरण, शेतकरी चिंतेत

विदर्भ प्रजासत्ताकदि.१२अमरावती

यंदाच्या कडक उन्हाळ्यात लिंबूला चांगला भाव मिळेल, या अपेक्षेने शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात माल बाजारात आणला होता. मात्र अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीत गेल्या आठ दिवसांत लिंबूच्या दरात तब्बल ५० टक्क्यांची घसरण झाली आहे. आठवडाभरापूर्वी १२० रुपये किलो दराने विक्री होणारा लिंबू आता केवळ ६० रुपये किलोपर्यंत खाली आला आहे. त्यामुळे लिंबू उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत.व्यापाऱ्यांच्या माहितीनुसार, बाजारात लिंबूची आवक वाढली असून ग्राहकांकडून मागणी कमी झाल्याने दर घसरले आहेत. उन्हाळ्याच्या सुरुवातीला लिंबूला मोठी मागणी होती,



त्यामुळे भाव तेजीत होते. मात्र सध्या बाजारपेठेत पुरवठा वाढल्याने दरावर दबाव निर्माण झाला आहे.दर घसरल्यामुळे वाहतूक, मजुरी आणि उत्पादन खर्चही निघणे कठीण झाल्याची भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. काही शेतकऱ्यांनी शासनाने हस्तक्षेप करून बाजारभाव स्थिर ठेवण्यासाठी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली आहे. लिंबूच्या दरातील या घसरणीमुळे कृषी क्षेत्रात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.